# क्रिककथा FreeHit




+91 84460 35509 | freehit@crickatha.com | www.crickatha.com

## अब कि बार ३०० पार ?

TMKOC अर्थात "तारक मेहता का उल्टा चष्मा" ही सगळ्यांचीच आवडती मालिका आहे. आज हा लेख लिहिताना ती आठवण्याचे मुख्य कारण म्हणजे आयपीएल. ह्या मालिकेच्या एका भागात दया जेठालालला सांगते की लहानपणी तिने तिच्या भावाबरोबर क्रिकेट खेळताना एकाच दिवसात साडे तीन हजार धावा केल्या होत्या. त्यावर जेठालाल आधी भीतीयुक्त आश्चर्याचे भाव आणतो आणि म्हणतो बॉल सोफ्याखाली गेला की फोर आणि सोफ्यावर गेला की सिक्स असं काहीसं तुम्ही खेळत असाल ! त्यांच्या अश्या संवादातील गम्मत वेगळीच !

आता हा जरी गमतीचा भाग असला तरी आयपीएलच्या १७व्या हंगामात धावांचा पाऊस चालू आहे ते पाहून मालिकेच्या संबंधित भागाची आठवण झाली. क्रिकेट हा फलंदाजांचा खेळ म्हटला जातो अर्थात हे तितकंसं खरं नाही. पण आज आयपीएल मध्ये होणाऱ्या धावा बघितल्या की लक्षात येईल. प्रत्येकाला आपल्या पाल्याला सचिन किंवा विराट करायचं असतं आणि आता जर आयपीएलचे सामने बघितले तर त्यात झटपट सामन्यांच्या श्रेणीत शुबमन, ईशान, ऋषभ, यशस्वी आणि रिंकू ह्यांची नावे प्रेरणा म्हणून पुढे येत आहेत. १२ मार्च २००६ ला झालेला एकदिवसीय सामना सगळ्यांनाच आठवत असेल ज्यात द. आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाच्या ४३४ धावांचा सामना ४३८ धावा करून जिंकला आणि त्यानंतर ४००च्या घरात होणाऱ्या धावा सगळ्यांच्याच आवाक्यात आल्या. आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात जरी २५० ते २८० धावा होत नसल्या तरी आयपीएल ही त्या सामन्यांची रंगीत तालीमच असते आणि इथे जर अश्या प्रकारे धावा होणार असतील तर आगामी काळात बीजगणितातील संभाव्यतेच्या आधारे १२० चेंडू मध्ये केवळ चौकार आणि षटकार गृहीत धरून ४८० ते ७२० धावा होतीलच अशी सांख्यिकी दिसायला वेळ लागणार नाही.

सर्वात महत्वाचे म्हणजे त्याचे पडसाद एकदिवसीय आणि कसोटी सामन्यात खेळाडूंच्या वैयक्तिक होणाऱ्या २००+ धावा मध्ये दिसतंच आहेत. आयपीलच्या संघात टिकणे आणि पुढे संघात निवड होणे यासाठी मोठी स्पर्धा आहे. त्यामुळेच बेफाम कामगिरी करण्यावर सर्वच फलंदाजांचा भर आहे. हा लेख लिहून प्रकाशित होईपर्यंत आयपीएलचे जवळपास एकवीस सामने शिल्लक असतील तेव्हा येणाऱ्या आयपीएल मध्ये आणि अर्थातच इतर मालिकांमध्ये काय नवीन विश्वविक्रम होतात हे बघणे औत्सुक्याचे ठरेल. त्यामुळेच हर बार जरी नाही तरी प्रत्येक टी-२० सामन्याआधी "अब कि बार ३०० पार" असे म्हणायला काहीच हरकत नाही !!!

## TATA IPL 2024 TABLE – May 4

| POS | TEAM | P | W | L | PTS |
|---|---|---|---|---|---|
| 1 | RR | 10 | 8 | 2 | 16 |
| 2 | KKR | 10 | 7 | 3 | 14 |
| 3 | LSG | 10 | 6 | 4 | 12 |
| 4 | SRH | 10 | 6 | 4 | 12 |
| 5 | CSK | 10 | 5 | 5 | 10 |
| 6 | DC | 11 | 5 | 6 | 10 |
| 7 | RCB | 11 | 4 | 7 | 8 |
| 8 | PBKS | 10 | 4 | 6 | 8 |
| 9 | GT | 11 | 4 | 7 | 8 |
| 10 | MI | 11 | 3 | 8 | 6 |

Orange Cap: Virat Kohli

Purple Cap: Jasprit Bumrah



सुप्रसिद्ध अभिनेते आणि क्रिकेटप्रेमी श्री समीर चौघुले ह्यांना क्रिककथा दिवाळी अंक २०२३ सप्रेम भेट !

## महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !!!

आयपीएल २०२४ मध्ये वेगवेगळ्या संघांकडून खेळणारे मैदान गाजवणारे महाराष्ट्र, मुंबई आणि विदर्भातील खेळाडू.

- **Chennai Super Kings**
  अजिंक्य रहाणे (मुं)
  शार्दुल ठाकूर (मुं)
  तुषार देशपांडे (मुं)
  प्रशांत सोळंकी (मुं)
  ऋतुराज गायकवाड (म)
  राजवर्धन हंगर्गेकर (म)
  मुकेश चौधरी (म)
  शिवम दुबे (मुं)
- **Kolkata Knight Riders**
  अंगक्रिश रघुवंशी (मुं)
- **Delhi Capitals**
  पृथ्वी शॉ (मुं)
  विकी ओस्तवाल (म)
- **Gujarat Titans**
  दर्शन नळकांडे (वि)
  उमेश यादव (वि)
- **Rajasthan Royals**
  शुभम दुबे (वि)
  तनुष कोटियन (मुं)
  यशस्वी जयस्वाल (मुं)
- **Mumbai Indians**
  रोहित शर्मा (मुं)
  सूर्यकुमार यादव (मुं)
  शम्स मुलाणी (मुं)
- **Punjab Kings**
  जितेश शर्मा (वि)
  अथर्व तायडे (वि)
- **Lucknow Super Giants**
  अर्शीन कुलकर्णी (म)
  यश ठाकूर (वि)

अंक क्र. २, ५ मे २०२४ रोजी श्री कौस्तुभ चाटे ह्यांनी श्री मनस्वी क्रिएशन्स अंतर्गत पुणे येथे प्रकाशित केला.

©2024 The material in this newsletter is copyrighted by CricKatha. Permission from the owner is required for the utilization or publication of this content.

## तापत्या आयपीएलच्या वातावरणात आंतरराष्ट्रीय टी२०च्या वाऱ्याची झुळुक



क्रिककथाचे अमेरिकेतील वाचक श्री राहुल शिंदे कोरी अँडरसन सोबत.

*यूएसए विरुद्ध कॅनडा यांच्यातील टी-२० मालिका वाऱ्याच्या झुळुकेप्रमाणे आली आणि गेली. आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी आपली तयारी दर्शवत यूएसएने चारही सामने जिंकले. २०१४ मध्ये न्यूझीलंडकडून खेळताना ३६ चेंडूत शतक झळकावणारा कोरी अँडरसन यूएस संघाचे प्रतिनिधित्व करण्यास पात्र ठरला. त्याने अंतिम सामन्यात कठीण परिस्थितीत अर्धशतकी खेळीने अमेरिकेला विजय मिळवून दिला. एकीकडे भारतासाठी १९ वर्षाखालील विश्वचषक जिंकणाऱ्या उन्मुक्त चंदला अमेरिकेच्या संघात स्थान मिळाले नाही. तर दुसरीकडे हरमित सिंहने सर्वाधिक बळी घेऊन संधीचं सोनं केलं.*

*२०२१ मध्ये न्यूझीलंडने पहिल्या सामन्याच्या काही तास आधी सुरक्षेच्या कारणास्तव त्यांचा पाकिस्तान दौरा रद्द केला होता तेव्हा, "न्यूझीलंडने नाणेफेक जिंकुन मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला" असा विनोद सर्वत्र पसरला होता.काही दिवसांपूर्वी न्यूझीलंडचा दुबळा संघ पाच टी-२० सामन्याच्या मालिकेसाठी पाकिस्तानात दाखल झाला आणि सर्व सामने खेळून मायदेशी परतला. पावसामुळे अनिर्णीत राहिलेल्या पहिल्या सामन्यानंतर, ही मालिका २-२ ने बरोबरीत सुटली. या मालिकेत चर्चेचे विषय राहिले ते म्हणजे बाबर आझमची कर्णधारपदी पुनर्नियुक्ती आणि मोहम्मद आमिरचे निवृत्तीनंतरचे पुनरागमन. शाहीन शाह आफ्रिदीने सर्वाधिक (८) विकेट घेतल्या, तर मार्क चॅपमनने  सर्वाधिक धावा (१३५) केल्या.*

*पाकिस्तानच्या महिला संघाबद्दल बोलायचे झाले तर विशेष उल्लेख करावा लागेल तो ३२ वर्षीय कर्णधार बिस्माह मारुफचा तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. एकूण ६,२६२ धावा आणि ८० बळी अशी एका अष्टपैलू खेळाडूला साजेल अशी कामगिरी बिस्माहने तिच्या कारकीर्दीत केली.तिच्यासाठी पाकिस्तान क्रिकेट मंडळाने "पालक धोरण" लागू केले होते ज्यामुळे ती मातृत्व सांभाळून उच्चस्तरीय क्रिकेट खेळू शकली. भविष्यात ह्या धोरणाचा फायदा इतर पाकिस्तानी महिला क्रिकेटपटूंना नक्कीच होईल.*

*मे महिन्यात एकीकडे आयपीएलचे सामने चालूच राहतील पण सोबतच इतर काही आंतरराष्ट्रीय टी-२० मालिकाही आहेतच. त्यातील काही प्रमुख मालिका खालीलप्रमाणे :*

| SERIES | MATCHES |
|---|---|
| IND-W VS BAN-W | 5 |
| ZIM VS BAN | 5 |
| USA VS BAN | 3 |
| MON VS JAP | 5 |
| NED-IRE-SCO | 6 |
| ENG VS PAK | 4 |

ICC
MEN'S T20
WORLD CUP
WEST INDIES & USA 2024

JUNE 1 – JUNE 29

Team India For T20 World Cup

Squad

Rohit Sharma (Captain), Hardik Pandya (Vice Captain), Yashasvi Jaiswal, Virat Kohli, Suryakumar Yadav, Rishabh Pant (WK), Sanju Samson (WK), Shivam Dube, Ravindra Jadeja, Axar Patel, Kuldeep Yadav, Yuzvendra Chahal, Arshdeep Singh, Jasprit Bumrah, Mohd. Siraj.

Reserves

Shubman Gill, Rinku Singh, Khaleel Ahmed and Avesh Khan

## Women's Senior Inter Zonal Trophy



Minnu Mani

The Women’s Senior Inter Zonal competition was arranged in April '24 in Pune. Almost all well-known Indian players participated in this tournament. The teams were divided into North Zone, Northeast Zone, East Zone, Central Zone, West Zone and South Zone. The first semi-final was played between East Zone and North Zone. East Zone won this match by 135 runs. In the second semi-final South Zone beat West Zone based on first innings lead.

The final match was played at Maharashtra Cricket Association's ground at Gahunje between East Zone and South Zone. It was a nail-biting finish, in which East Zone beat South Zone by 1 wicket. This match will be remembered for the heroics of the spin bowlers from both sides. South Zone captain Minnu Mani (8 wickets) and East Zone captain Deepti Sharma (10 wickets) bowled brilliantly on this wicket. Deepti showed her batting skills as well.

Poonam Raut (258 runs) of Central Zone and Deepti Sharma (27 wickets) were the highest run scorers and wicket takers in this tournament. The Indian Women's team has recently beaten both England and Australia in Test Cricket. This enabled the BCCI to conduct Senior Women's Inter Zonal Matches. We hope this tournament happens very often and we get to see many more talented players performing at the highest level in the domestic circuit.



Deepti Sharma

*अंक क्र. २, ५ मे २०२४ रोजी श्री कौस्तुभ चाटे ह्यांनी श्री मनस्वी क्रिएशन्स अंतर्गत पुणे येथे प्रकाशित केला.*

*©2024 The material in this newsletter is copyrighted by CricKatha. Permission from the owner is required for the utilization or publication of this content.*

# वयाच्या ६७ व्या वर्षी शतक



शतक झळकावणारा सर्वात वयस्कर भारतीय !!!*

विश्वास नाही ना बसत!! पण ही किमया करून दाखवली आहे प्रदीप गोडबोले ह्यांनी. काही दिवसांपूर्वी चेन्नई मध्ये झालेल्या ६० वर्षांवरील क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत प्रदीप गोडबोले ह्यांनी वयाच्या ६७ व्या वर्षी शतक झळकावण्याचा पराक्रम केला.IDBI बँकेतून Deputy General Manager म्हणून निवृत्त झालेले प्रदीप गोडबोले म्हणजे हाडाचे क्रिकेटपटू. त्यांच्या उमेदीच्या काळात ते सुनील गावसकर, दिलीप वेंगसरकर ह्यांसारख्या दिग्गज्जांबरोबर मुंबईमध्ये क्रिकेट खेळले आहेत.

त्यावेळच्या मुंबई क्लब क्रिकेटमध्ये प्रदीप गोडबोले हे नाव अतिशय आदराने घेतले जात असे. निवृत्तीनंतर देखील त्यांनी आपला क्रिकेट खेळण्याचा छंद कायम ठेवला आहे. विशेष म्हणजे त्यांची दोन वेळा अँजिओप्लास्टी झाली आहे, शरीरात ७ स्टेंट्स आहेत तरीही सर कायमच क्रिकेटच्या मैदानावर दिसतात.

फेब्रुवारी २०२४ मध्ये चेन्नईमध्ये झालेल्या स्पर्धेत शेष-विश्व (Rest of the World) संघाविरुद्ध खेळत असताना त्यांनी ११० चेंडूत नाबाद १०८ धावांची खेळी केली, ज्यामध्ये १५ चौकार होते. ही खेळी खेळणे निश्चितच सोपे नव्हते. फलंदाजी करताना त्यांना मध्येच त्रास देखील झाला, तब्ब्येत थोडी बिघडली. पण जिद्दीने फलंदाजी करत त्यांनी आपले शतक पूर्ण केले. मात्र शतकानंतर तब्ब्येतीचा विचार करता ते पॅव्हेलियन मध्ये परतले. (ह्याचाच अर्थ त्यांची ही खेळी नाबाद शतकी खेळी होती.) देशांतर्गत भारतीय क्रिकेटचा विचार करता प्रदीप गोडबोले हे सर्वाधिक वयाचे शतकवीर असावेत असे मानले जाते. स्वभावाने अतिशय विनम्र असलेले प्रदीप गोडबोले आता पुण्यात तरुण क्रिकेटपटूंना कोचिंग करतात. त्यांचा स्वभाव आणि मित्र जोडायची सवय ह्यामुळे ते जगन्मित्र आहेत असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. वयाची ६६ वर्षे आणि २०५ दिवस - ह्या दिवशी शतक साकारणाऱ्या प्रदीप गोडबोलेंना मानाचा मुजरा !!!

*Confirmed by association of cricket statisticians and scorer of India*






CricKatha FreeHit

मध्ये आपल्या व्यवसायाची, उद्योगाची, उत्पादनांची जाहिरात करा आणि जगभरात पोहचा. अधिक माहितीसाठी संपर्क साधा

+91 84460 35509

## FUN FACT

*सुधाकर अधिकारी हे १९६० च्या दशकातील मुंबई मधील एक मोठं नाव. ते साधारण १९५९ ते १९७०-७१ पर्यंत मुंबई साठी क्रिकेट खेळले. दुर्दैवाने ते भारतीय संघासाठी खेळू शकले नाहीत, पण ते अतिशय उत्कृष्ट फलंदाज होते. ते मुंबईसाठी सलामीला फलंदाजी करत असत. १९६५ च्या नोव्हेंबर महिन्यात मुंबईत ब्रेबॉर्न स्टेडियमवर मुंबई विरुद्ध महाराष्ट्र असा रणजी ट्रॉफीचा सामना खेळला जाणार होता. ज्या दिवशी तो सामना सुरु होणार होता (१३ नोव्हेंबर १९६५), त्याच दिवशी सकाळी सुधाकर अधिकारी ह्यांचा विवाह होता. त्या दिवशी अधिकारी सकाळी विवाहबद्ध झाले, आणि ब्रेबॉर्न स्टेडियमवर सामना खेळण्यासाठी निघून गेले. भरीस भर म्हणून मुंबई संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजी घेतली, आणि लगेचच अधिकारींना फलंदाजीला जावे लागले. त्या दिवशी त्यांनी मुंबईसाठी शतक झळकावले. मुंबईने केलेल्या ३८१ धावांमध्ये त्यांच्या ११० धावांचा समावेश होता. दिवसाचा खेळ संपल्यानंतर अधिकारी परत लग्नाच्या रिसेप्शनला निघून गेले.*

*पुढे अनेक वर्षांनी त्यांना ह्या प्रसंगाबद्दल विचारले असता त्यांनी अतिशय मार्मिक उत्तर दिले होते. ते म्हणाले," माझ्यासाठी तो सामना महत्वाचा होता. कारण मी जर तो सामना खेळलो नसतो, तर माझ्याऐवजी दुसऱ्या खेळाडूला संधी मिळाली असती, आणि जर त्याने उत्तम खेळ केला असता तर परत मुंबई संघासाठी माझी वर्णी कधी लागली असती ते माहित नाही. मी ती रिस्क घेऊ शकत नव्हतो." त्याकाळी खरोखरच मुंबई संघात निवड होणे अवघडच असे.*

**CricKatha FreeHit**
is a monthly supplement of the Diwali edition of CricKatha, available for free distribution in PDF format. To receive it send your **Name** Space **City** Space **Hi** to **+91 84460 35509** from your WhatsApp number.

**Trivia Questions:**

- Which famous cricketer is nicknamed as 'The Whispering Death'?

Kindly send your answers to freehit@crickatha.com before 20 May 2024.

Winners of April Quiz

1. Appa Linge - Mumbai
2. Ketan Patil – Pune
3. Vijay Joshi - Mumbai

Connect with CricKatha on Social-Media

https://crickatha.com/blogs

https://twitter.com/CricKatha

https://www.facebook.com/CricKatha

https://www.instagram.com/crickatha

www.youtube.com/@cricketasyakatharamya9133

#crickatha #cricket #marathicricket #diwaliank #crickathafreehit

*अंक क्र. २, ५ मे २०२४ रोजी श्री कौस्तुभ चाटे ह्यांनी श्री मनस्वी क्रिएशन्स अंतर्गत पुणे येथे प्रकाशित केला.*

*©2024 The material in this newsletter is copyrighted by CricKatha. Permission from the owner is required for the utilization or publication of this content.*